CIDCO
WE MAKE CITIES
प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
सिडको
शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. १८.०९.२०२०**

**महाड इमारत दुर्घटने प्रसंगी सिडको अग्निशमन दलाने केलेल्या कार्याचा गौरव**

महाड येथे २४ ऑगस्ट २०२० रोजी कोसळलेल्या इमारतीच्या ढिगाऱ्याखाली सापडलेल्या लोकांचा शोध घेण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या बचाव कार्यादरम्यान सिडको अग्निशमन दलाच्या अधिकारी व जवानांनी केलेल्या कामाचा गौरव रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्याकडून करण्यात आला. या दुर्घटनेप्रसंगी सिडको अग्निशमन दलाने केलेल्या कामाची **श्रीमती आदिती तटकरे**, मा. पालकमंत्री, रायगड जिल्हा आणि **श्रीमती निधी चौधरी**, जिल्हाधिकारी, रायगड यांनी प्रशंसा करून दिनांक १८ सप्टेंबर २०२० रोजी अलिबाग येथे पार पडलेल्या कार्यक्रमात सिडको अग्निशमन दलाच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांस प्रमाणपत्रही प्रदान करण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यातील महाड येथे २४ ऑगस्ट २०२० रोजी तारिक मॅन्शन ही ५ मजली इमारत कोसळली होती. सदर इमारतीत २०० ते २५० रहिवासी राहात होते. इमारतीच्या ढिगाऱ्याखाली अनेकजण अडकून पडले होते. या प्रसंगी हाती घेण्यात आलेल्या शोध व बचाव कार्यामध्ये सिडकोच्या अग्निशमन दलानेही भाग घेत ढिगाऱ्याखाली अडकून पडलेल्या रहिवाशांना बाहेर काढण्यासाठी एनडीआरएफ व अन्य बचाव पथकांना सहकार्य केले.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी, सिडको**